सन २०२६-२७ मध्ये राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियान ही केंद्र पुरस्कृत योजना राबविण्यासाठी सर्वसाधारण प्रवर्ग व अनुसूचित जमाती प्रवर्गांचा निधी वितरीत करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्सव्यवसाय विभाग**

**शासन निर्णय क्रमांक : कृवपदुम १२०२७/५८/२०२६- MAG-1A**

**संगणक क्रमांक : १६६०२२०**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक

मंत्रालय, विस्तार, मुंबई- ४०००३२

दिनांक : २२ मे, २०२६

**वाचा:-**

१) सह सचिव, कृषि व शेतकरी कल्याण, भारत सरकार यांचे अ.शा. पत्र जा.क्र.९-३/२०२२-Org Fmg दिनांक २६/१२/२०२४ (NMNF मार्गदर्शक सुचना)

२) कृषि व पदुम विभाग शासन निर्णय क्रमांक : कृवपदुम-१२०२७/८०/२०२५-MAG-1A, दि. ३ फेब्रुवारी, २०२५

३) कृषि व पदुम विभाग शासन निर्णय क्रमांक: कृवपदुम-१२०२७/८०/२०२५-MAG-1A, दि. २५ एप्रिल, २०२५

४) वित्त विभाग शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि.०९.०४.२०२६

५) अवर सचिव, कृषि व शेतकरी कल्याण, भारत सरकार यांचे पत्र फाईल.क्र.२०-१९/२०२५-NMNF, दि. २४ एप्रिल, २०२६

६) कृषि व पदुम विभाग शासन निर्णय क्रमांक: कृवपदुम-१३०२५/४८/२०२६-MAG-2A, दि.०५.०५.२०२६ (प्रशासकीय मान्यता)

७) वित्त विभाग शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि.०७.०५.२०२६

८) आदिवासी विकास विभाग शासन परिपत्रक क्र. बीयुडी-२०२६/प्र.क्र.६१/कार्या-६, दि.१३.०५.२०२६

९) संचालक (आत्मा), कृषि आयुक्तालय, पुणे यांचे पत्र जा.क्र. कृआ/रानैशेअ/सर्वसाधारण/निमा/प्रथम हप्ता/२६२-र/२०२६, दि. ०५.०५.२०२६

१०) संचालक (आत्मा), कृषि आयुक्तालय, पुणे यांचे पत्र जा.क्र. कृआ/रानैशेअ/अ. जमाती/निमा/प्रथम हप्ता/२६४-र/२०२६, दि. ०५.०५.२०२६

**प्रस्तावना :-**

राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियान या केंद्र पुरस्कृत योजनेसाठी वाचा क्रमांक ६ येथील शासन निर्णयान्वये रूपये १५१.१६ कोटी च्या वार्षिक कृती आराखड्यास मान्यता देण्यात आली आहे. सदर योजना केंद्र व राज्य हिस्सा ६०:४० या प्रमाणात राबविण्यात येते.

२. राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियान ही योजना सन २०२६-२७ या आर्थिक वर्षामध्ये राबविण्यासाठी पहिल्या हप्त्यापोटी सर्वसाधारण प्रवर्गासाठी केंद्र हिश्शाचा रू. २७,५७,४२,०००/- (रुपये सत्तावीस कोटी सत्तावन्न लक्ष बेचाळीस हजार फक्त) व अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी केंद्र हिश्श्याचा रु. ३,५३,५१,०००/- रूपये (रुपये तीन कोटी त्रेपन्न लक्ष एक्कावन्न हजार फक्त) निधी केंद्र शासनाने संदर्भ क्र. ५ येथील पत्रान्वये उपलब्ध करून दिला आहे. त्यानुषंगाने निधी वितरीत करण्याबाबतचे कृषि आयुक्तालयाचे प्रस्ताव वाचा क्र.९ व १० अन्वये प्राप्त झाले आहेत. राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियानांतर्गत

सर्वसाधारण व अनुसूचित जमाती या प्रवर्गांचा एकूण केंद्र हिश्श्याचा निधी रू. ३१,१०,९३,०००/- (रुपये एकतीस कोटी दहा लक्ष त्र्याण्णव हजार फक्त) व त्यास समरुप राज्य हिश्याचा रु. २०,७३,९५,३३३/- (रुपये वीस कोटी त्र्याहत्तर लक्ष पंच्याण्णव हजार तीनशे तेहतीस फक्त) असा एकूण रु. ५१,८४,८८,३३३/- (रुपये एक्कावन्न कोटी चौऱ्याऐंशी लक्ष अठ्ठ्याऐंशी हजार तीनशे तेहतीस फक्त) निधी कृषि आयुक्तालयास वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियान ही केंद्र पुरस्कृत योजना राबविण्यासाठी सर्वसाधारण व अनुसूचित जमाती या प्रवर्गाचा एकूण केंद्र हिस्सा रु. ३१,१०,९३,०००/- (रुपये एकतीस कोटी दहा लक्ष त्र्याण्णव हजार फक्त) व त्यास समरुप राज्य हिश्श्याचा रु. २०,७३,९५,३३३/- (रुपये वीस कोटी त्र्याहत्तर लक्ष पंच्यान्नव हजार तीनशे तेहतीस फक्त) असा पहिल्या हप्त्याचा एकूण रु. ५१,८४,८८,३३३/- (रुपये एक्कावन्न कोटी चौऱ्याऐंशी लक्ष अठ्ठ्याऐंशी हजार तीनशे तेहतीस फक्त) इतका निधी, सन २०२६-२७ च्या अर्थसंकल्पीत निधीमधून खाली नमूद केल्याप्रमाणे प्रवर्गनिहाय कृषी आयुक्तालयास वितरीत करण्यात येत आहे.

| | **सर्वसाधारण** | **अनुसूचित जमाती** | **एकूण** |
|---|---|---|---|
| **केंद्र हिस्सा** | २७,५७,४२,००० | ३,५३,५१,००० | ३१,१०,९३,००० |
| **राज्य हिस्सा** | १८,३८,२८,००० | २,३५,६७,३३३ | २०,७३,९५,३३३ |
| **एकूण** | ४५,९५,७०,००० | ५,८९,१८,३३३ | ५१,८४,८८,३३३ |

२. सदर निधी प्रदान केलेल्या प्रशासकीय मान्यतेनुसार खर्च करण्यात येईल याची दक्षता घेण्यात यावी. या प्रित्यर्थ होणारा खर्च मंजूर होणाऱ्या अनुदानातून भागविण्यात येऊन पुढील लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

| | **केंद्र हिस्सा (६०%)** | **राज्य हिस्सा (४०%)** |
|---|---|---|
| **सर्वसाधारण** | मागणी क्रमांक डी -३,<br>२४०१-पीक संवर्धन,<br>१०५- खते व रासायनिक खते<br>(००)(३८)राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियान (केंद्र हिस्सा ६०%) (कार्यक्रम)<br>२४०१ बी ६२४ | मागणी क्रमांक डी -३,<br>२४०१-पीक संवर्धन,<br>१०५- खते व रासायनिक खते<br>(००)(३९)राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियान (राज्य हिस्सा ४०%) (कार्यक्रम)<br>२४०१ बी ६३३ |
| **अनुसूचित जमाती** | मागणी क्रमांक टी-५<br>२४०१-पीक संवर्धन,<br>७९६- जनजाती क्षेत्र उपयोजना<br>(०१) जनजाती क्षेत्र उपयोजना<br>(०१) (४३) राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियान (एनएमएनएफ) (केंद्र हिस्सा ६० %)(कार्यक्रम)<br>२४०१ बी ६०६ | मागणी क्रमांक टी-५<br>२४०१-पीक संवर्धन,<br>७९६- जनजाती क्षेत्र उपयोजना<br>(०१) जनजाती क्षेत्र उपयोजना<br>(०१) (४४) राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियान (एनएमएनएफ) (राज्य हिस्सा ४० %)<br>(कार्यक्रम)<br>२४०१ बी ६१५ |

३. सदर योजना राबविताना खालील अटी व शर्तींचे पालन करण्यात यावे-

१. सदर योजना केंद्र शासनाच्या संदर्भाधिन मार्गदर्शक सुचनानुसार आणि केंद्र व राज्य शासनाच्या निधी वितरीत करण्याच्या अटी व शर्तीनुसार राबविण्यात यावी.

२. खर्चाचे लेखे सुव्यवस्थित ठेवून सदर खर्चाचे लेखा परिक्षण अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्रे केंद्र व राज्य शासनाला लवकरात लवकर प्रगती अहवालासह सादर करण्यात यावेत. योजनेच्या वेगवेगळ्या बाबींवरील भौतिक व आर्थिक प्रगती अहवाल केंद्र व राज्य शासनास प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यंत सादर करण्यात यावा.

३. योजनेशी संबंधित ताळेबंद व लेखापरिक्षण जमा खर्चाच्या रकमा यांचा अहवाल अंमलबजावणी यंत्रणेने द्यावा. त्यामध्ये वर्षाच्या सुरूवातीला अखर्चीत रकमा व व्याजाद्वारे मिळालेले उत्पन्न स्पष्टपणे नमूद करण्यात यावे. जेणेकरून पारदर्शी स्वरूपात रकमा विचारात घेता येतील व संदिग्धता राहणार नाही.

४. कोणत्याही परिस्थितीत मंजूर कार्यक्रमापेक्षा जास्तीचा कार्यक्रम राबविला जाणार नाही याची दक्षता घ्यावी.

५. सदर निधी खर्च करताना विहित कार्यपद्धती अनुसरून सर्व वित्तीय कायदे /टेंडर नियमावली व नियमांचे /प्रक्रियेचे /वित्तीय अधिकारांच्या मर्यादेत/P.W.D/मॅन्युअलचे अधिन राहून /C.V.C.तत्वानुसार /CAG च्या निर्देशानुसार/प्रचलित शासन निर्णय/नियम/परिपत्रक/ तरतुदी नुसार, बजेट व कोषागार नियमावली नुसार खर्च करण्याची कार्यवाही अमंलबजावणी यंत्रणांनी करावी. कोणत्याही परिस्थितीत कुठलाही शासन नियम/अधिकाराचा भंग होणार नाही, याबाबत दक्षता घेण्याची जबाबदारी संबंधित क्षेत्रिय कार्यालयाची राहील.

६. सदर योजनेकरीता मंजूर झालेला निधी हा ज्या प्रवर्गाकरीता मंजूर करण्यात आला आहे त्याच प्रवर्गासाठी खर्च होईल याची दक्षता घेण्यात यावी.

७. वाचा क्र. ५ येथील केंद्र शासनाच्या पत्रात नमूद केलेल्या सूचनांचे पालन करण्यात यावे.

८. वित्त विभागाच्या वाचा क्र .४ येथील परिपत्रकातील अटींचे पालन करण्यात यावे. तसेच सदर परिपत्रकासोबतच्या परिशिष्टातील अ.क्र. ९ येथे नमूद बाबींची पूर्तता करण्यात यावी .

४. सदर योजनेकरीता आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना योजनेचे नियंत्रण अधिकारी म्हणून व त्यांच्या कार्यालयातील सहायक संचालक, लेखा यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

५. सदर निधी खर्च करतांना विहित कार्यपध्दती अनुसरुन सर्व वित्तीय कायदे/ टेंडर नियामावली व नियमांचे /प्रक्रियेचे /वित्तीय अधिकारांच्या मर्यादेत /P.W.D. मॅन्युअलच्या अधिन राहून /C.V.C.तत्वानूसार /CAG च्या निर्देशानुसार /प्रचलित शासन निर्णय /नियम /परिपत्रक / तरतुदीनुसार, बजेट व कोषागार नियमावलीनुसार खर्च करण्याची कार्यवाही अंमलबजावणी यंत्रणांनी करावी. कोणत्याही परिस्थितीत कुठलाही शासन निर्णय/अधिकाराचा भंग होणार नाही, याबाबत दक्षता घेण्याची जबाबदारी संबंधित क्षेत्रिय कार्यालयाची राहिल.

६.	सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२५/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि.०७.०५.२०२६ व आदिवासी विकास विभाग शासन परिपत्रक क्र. बीयुडी-२०२६/प्र.क्र.६१/कार्यासन-०६, दि.१३.०५.२०२६ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

७.	सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेताक २०२६०५२२१८४२०६३८०१ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SUHAS MADHUSUDAN SAKPAL

Digitally signed by SUHAS MADHUSUDAN SAKPAL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=AGRICULTURE AND ADF DEPARTMENT,
2.5.4.20=01592dd98f36fbc924826517361a31b8166fce7745d35b95fa79159b8fb74478, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=82434617B1F4C6035B3CC29788B8D394A52FB3EDABFC26B4E85EBC2AF7C45FF9, cn=SUHAS MADHUSUDAN SAKPAL
Date: 2026.05.22 18:44:06 +05'30'

**( सुहास सकपाळ )**

**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति :**

१. मा.मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा. राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई
४. सचिव (कृषि) यांचे स्वीय सहायक, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
६. संचालक (आत्मा), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
७. महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/ नागपूर .
८. सर्व कृषि संचालक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
९. सर्व विभागीय कृषि सहसंचालक.
१०. सर्व प्रकल्प संचालक, आत्मा.
११. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
१२. सहाय्यक संचालक, लेखा -१, कृषि आयुक्तालय महाराष्ट्र राज्य, पुणे.
१३. कार्यासन १४३१, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४. वित्त विभाग (व्यय-१), मंत्रालय, मुंबई.
१५. निवडनस्ती (कार्यासन १-अे), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.